# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २८ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ३१/०१/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**३१/०१/२०२० शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ न्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.बालाणी भगतराम रावलमल | श्री. पाटील राजेंद्र झिपरु |
| श्री.ढेकळे सदाशिव गणपत | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री.पोकळे दिलीप बबनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. खडके सुनिल वामनराव | श्री.लढढा नितीन बालमुकुंद |
| श्री.सनकत चेतन गणेश | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री. सोनवणे मुकुंदा भागवत | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त श्री. उदय टेकाळे, मा.उपायुक्त. श्री. अजित मुठे, मा.उपायुक्त, श्री.मिनीनाथ दंडवते, मा.नगररचनाकार श्री. पवार, मुख्यलेखापरिक्षक .श्री. संतोष वाहुळे, शहर अभियंता श्री.सुनिल भोळे व नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.०३/०१/२०२० व दि.१०/०१/२०२० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.चेतन सनकत :-** विषय मान्य करण्यात येत आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.०३/०१/२०२० व दि.१०/०१/२०२० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत पिंप्राळा हुडको बौध्द वसाहत जवळ प्रस्तावीत अंध व अंपगांसाठीचे घरकुलांची दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ४% जास्तीचे दर स्विकृत करुन सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.४२,५६,८६७/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** विषय मान्य करण्यात येत आहे.

**श्री.भगतराम बालाणी:-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ही खुप आनंदाची गोष्ट आहे आपले अंध अपंग बांधव बऱ्याच दिवसापासुन घरांच्या प्रतिक्षेत होते. आज आपण जे मेनटेनंससाठी रु.५६,८६७/- खर्च करतो. मा.सभापती महोदया, ४०० घरकुलांची एक स्कीम आपण मागे पंचवार्षिक मध्ये सुरु केलेली होती. आणि त्यामध्ये ७६ घरे आजपावेतो वाटप केली गेलेली नाही. ७६ घरं तयार करुन अद्याप दिड वर्ष झालेला आहे. ज्या वेळेला आमची सत्ता होती. त्यावेळेला पुर्णत्वात आलेले होते. त्याच्यानंतर आचारसंहिता लागली नंतर सत्ता बदल झाला. साधारणता दिड वर्षाचा कालावधी झाला. आज त्या घरांची परिस्थिती तुम्ही स्वत: येऊन बघाल खुप डॅमेजेस झालेले आहे. वायरी निघालेली आहे. नळ चोरुन नेलेले आहे. खिडकीचे काचं फुटलेले आहे. दरवाज्यांची तोडफोड झालेली आहे. प्रचंड प्रमाणावरती त्या मालमत्तेचा नुकसान झालेला आहे. मक्तेदाराने ती महानगरपालिकेला हस्तांतरीत करुन दिली. आता काय झालेलं आहे. हा खर्च सुध्दा महानगरपालिकेच्या अंगावर आलेला आहे. आणि दिड वर्षापासुन जे उरलेले बांधव आहे ते ही वंचित राहिले आहे. अस कुठेतरी नियोजन व समंवय चुकत

आहे. म्हणजे याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज होती. म्हणजे यात प्रशासनाला बोट दाखुन चालणार नाही. कारण हे घरकुल वाटप करणे कुठेतरी अडचणीच होत. फस्ट कम फस्ट सर्वांना द्यायच की, चिठ्ठी सिस्टीमने द्यायच याच्या संदर्भात समिती सुध्दा गठीत झाली. परंतु समितीचा सुध्दा अद्यापपावेतो निर्णय झालेला नाही. आणि मालमत्तेचे नुकसान होत असतांना आपण कोणालातरी जबाबदार धरतो. हे योग्य नाही. म्हणजे आता परवाचाच विषय बघा तुम्ही. रामानंद नगरच्या रस्त्याच्या संदर्भात साधारणता २५ दिवसापुर्वी स्थायी समिती मध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर कामाला योग्य पध्दतीने सुरुवात ही झाली होती. कामाला सुरुवात झाल्यानंतर हा विषय अनुदानाच्या माध्यमातुन येणे अपेक्षित ही नव्हते. वास्तविक सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी अश्या पध्दतीने आंदोलन करणे. आंदोलन केल्यानंतर जळगांव शहराचे सन्मा.आमदार त्या ठिकाणी जातात. आणि नागरीक त्यांच्या भावना व्यक्त करतात. परंतु अश्या संपुर्ण अपयशी मध्ये त्या संपुर्ण अपयशाचा खापर अधिकाऱ्यांवरती फोडले जाते .

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपली ही चर्चा वेगळया विषयाला वळत आहे. या विषयाला आपली संमती आहे की विरोध आहे फक्त याच विषयावर आपण बोला.

**श्री.नितीन लढढा :-** गंभिर आरोप झालेले आहे या विषयावरती.

**मा.सभापती :-** विषयांतर होत आहे. विषयपत्रिकेवरच्या विषयावर आपण बोलावे.

**श्री.**सुनिल खडके :- विषय धरुन बोला भाऊ

**श्री.नितीन लढढा :-** याच्यावर चर्चा करायला नंतर परवानगी द्याल का ?

**श्री.भगतराम बालाणी :-** यांच्या बोलण्यावरुन असं वाटत की, राजु मामा भोळेंनी जे काही अधिकाऱ्यांवर आरोप केलेले आहे त्यांच्यामागे हेच आहे. हे सिध्द झाले.

**श्री.नितीन लढढा :-** मागे असण्याच प्रश्न नाही. चांगल्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे. स्वत:च अपयश लपवायच आहे.

**मा.सभापती :-** माझी सर्व सदस्यांना सुचना आहे की, त्यांनी बसुन घ्याच आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** विषय काय आहे आणि चर्चा काय करत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मला सांगा पदाधिकारी करतात काय येथे ? पदाधिकारी अनंत काळापर्यंत सभा चालवतात. अधिकाऱ्यांसोबत चर्चा होतात. परंतु निष्पन्न काय होत आहे.

**श्री. सुनिल खडके :- भाऊ हा विषय वेगळा चालु आहे.**

**श्री.भगतराम बालाणी :-** पहिले अजंडयावरचे विषय होऊन जाऊ द्या.

**श्री. विष्णु भंगाळे :-** म्हणजे तुमच असे म्हणणे आहे की, रामानंद नगर रस्तेच्या विषयामध्ये फक्त अधिकारीच दोषी आहे का ?

**श्री.भगतराम बालाणी :-** नितीन भाऊ तो विषय आहे का ? हे बरोबर नाही चुकीच आहे.

**मा.सभापती :-** सर्व सभासदांनी बसुन घ्या. सर्वांनी बसुन घ्यायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया वेगळ मत मांडायला वेळ मिळणार आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** १६ महिन्यांमध्ये या महानगरपालिकेत एक तरी सकारात्मक काम दाखवा.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपल्याला विनंती आहे. आपण बसुन घ्यावे.

**श्री.नितीन लढढा :-** स्वत:ची सत्ता स्वत:चे महापौर आहे आणि अधिकारी काम ऐकत नाही.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** नितीन भाऊ विषय पत्रिकेचे विषयांवर चर्चा करा.

**श्री.भगतराम बालाणी :-** नितीन भाऊ आता विषय कोणता चालु आहे घरकुलचा त्या विषयावर बोला ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्यांनी उदाहरण दिलेले आहे प्रशासना बाबतच वाचन नाही. समजुन तर घ्या विषय काय आहे.

**श्री.नितीन लढढा :-** चला घरकुल बाबतीतच बोलतो, मला सांगा, ७६ घरांची जी तोडफोड झालेली आहे त्याची जबाबदारी कोणावर फिक्स कराल तुम्ही.

**श्री.भगतराम बालाणी :-** अधिकाऱ्यांवर. तुम्ही जाणार का तेथे पाहणीसाठी.

**श्री.नितीन लढढा :-** याची पॅलिसी ठरविलेली नाही. पॉलिसी ठरविण्याच काम सभागृहाच आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** घरकुलांच काम कधी पासुन झालेल आहे. तुम्ही का वाटप केले नाही.

**मा.सभापती :-** विष्णु भाऊ, नितीन भाऊ व सर्व सदस्यांनी बसुन घ्यायचे आहे.

**श्री.नितीन लढढा :-** या प्रेझेंट विषयावरच चर्चा करत आहे.

**मा.सभापती :-** चर्चा शांतपणे झाली पाहिजे. तरच त्याच्यातुन काही तरी आऊटपुट निघेल.

**श्री.नितीन लढढा :-** निघायलाच पाहिजे त्याचसाठी चर्चा करतो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया भाऊ शांततेत चर्चा करत होते. तुम्ही ऐकुन घेतल नाही. हे जर दोन्ही तिन्ही उठले नाही. तर काय विषय उरेल.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ बोलत असतांना सर्वांनी खाली बसायचं आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ते बोलत होते ना. तर मध्ये अडथळा आणु नका.

**श्री.सुनिल खडके :-** विषयांतर होत आहे भाऊ, विषयाला धरुन बोला, घरकुलांच विषय आहे.

**श्री.नितीन लढढा :-** सुनिल भाऊ मी कार्यपध्दतीच्या अनुषंगाने बोलत आहे. या संदर्भातला हे डॅमेजेस झालेले घरकुल आणि याच वाटप होण्या संदर्भात गेल्या दोन महिने पुर्वी सुध्दा मी याच्या संदर्भात प्रशासनाला आणि आपल्याला फोटोग्राफ्स ही दिलेले होते. आज साधारणता मला सांगा त्या गोष्टीला दोन महिने होऊन गेले. दोन महिन्याच्या कालावधी नंतर ही त्या ७६ घरकुलांच्या वाटपाबद्दल कोणताही धोरण ठरविले नाही. आपण वारंवार प्रशासनाला दोषी धरतो त्याच्या अनुषंगाने म्हणतो की, प्रशासनाचा काम ऐक्जीक्युट करण्याच आहे. आणि पॉलिसी ठरविण्याचा अधिकार जे आहे या सभागृहाचा आहे. सभागृहाने हे ७६ घरकुले कश्या पध्दतीने वाटप करायची त्याच्या संदर्भातील पॉलिसी अजुन सभागृहाने प्रशासनाला ठरवुन दिलेली नसल्याने हा विषय प्रलंबीत आहे.

**मा.सभापती :-** आपण ज्या विषयावर बोलत आहात नितीन भाऊ प्रशासनाला या संदर्भात सुचना दिल्या जातील. आणि लवकरात लवकर योग्य निर्णय घेतला जाईल.

**श्री.नितीन लढढा :-** विषयाच्याच संदर्भात सांगतो, गेल्या सहा महिन्यापासुन मेहरुण येथील घरकुल अपुर्ण अवस्थेत पडलेली, ज्याच भुसंपादन होऊन साधारणता बरेच वर्षे झालेली आहे. आणि या संदर्भात मी कमीतकमी सातव्यांदा आठव्यांदा बोलत आहे. तेथे जमीन मालकाच्या कब्ज्यात अजुन ही जागा आहे.भुसंपादनाचा कोटयावधी रुपयांचा मोबदला जमिन मालकाला दिलेला आहे. महानगरपालिकेच्या हिताच्याच गोष्टी निदर्शनात आणत आहे.

**मा.सभापती :-** निश्चितच.

**श्री.नितीन लढढा :-** आमच व्यक्तीगत हित कशा मध्येच नाही. ना ही प्रशासनाच्या कामांमध्ये आहे ना ही अधिकाऱ्यांच्या स्वार्थामध्ये आहे किंवा दुसऱ्या कामांमध्ये.

**मा.सभापती :-** कोणाचाच याच्या मध्ये व्यक्तीगत हित नाही आणि नसायलाच हवं. येथे आपण लोकप्रतिनिधी म्हणुन आलेलो आहोत. हे गोष्टी आपण सर्वेच लक्षात ठेवतो.

**श्री.नितीन लढढा :-** आम्ही कुठलीही मागणी बेकायदेशीर करत नाही. समक्ष नियमानेच करत आहे.

**मा.सभापती :-** आपल्याला कोणीही काही म्हटल का ? आपण बेकायदेशी मागणी करत आहात. शांततेच्या मार्गाने जर चर्चा झाली तर त्याच्यावर तोडगा निघेल. आपला हा जो विषय आहे मांडलेला घरकुलचा, तो अनेकदा आपण मांडलेला आहे. आणि आता आयुक्त साहेबांनी सुध्दा सुचविलेला आहे की, आपले जे नविन ए.डी.टी.पी. आलेले आहे. पवार साहेब त्यांच्याकडे हा विषय आपण हँडओवर करत आहे. आणि त्यांनी हा विषय लवकरात लवकर मार्गी लावा त्यासाठी आपण सर्व त्यांना मदत करु. धोरणात्मक निर्णयाचा विषय असेल धोरणात्मक निर्णय सुध्दा ताबडतोब घेऊ या. प्रशासनाला सुचना दिली जात आहे की, प्रशासनाने ताबडतोब माहिती घेऊन या विषयास मार्गी लावण्याची कार्यवाही करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत पिंप्राळा हुडको बौध्द वसाहत जवळ प्रस्तावीत अंध व अंपगांसाठीचे घरकुलांची दुरुस्ती करणेचे कामास आयुक्त यांनी दि.२८/०८/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.१४३६ दि.१५/०९/२०१९ व ई निविदा सुचना क्र.०७ २०१९-२० https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली. दिलेल्या मुदतीत एकही ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नाही. उक्त निविदेस शहर अभियंता यांनी मुदतवाढ देल्यानुसार मनपा पत्र क्रं.सा.बा/८२९ दि.२६/११/२०१९ चे पत्रान्वये दै.तरुण भारत या वर्तमान पत्रात दि.२७/११/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असता मुदतीत एकही ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नाही. सदर निविदेस दुसऱ्यावेळेस मुदतवाढ दिल्यानुसार प्रतिसाद न मिळाल्याने शहर अभियंता यांनी तिसऱ्या वेळेस मुदतवाढ देवुन निविदा भरणेकरीता दि.१८/११/२०१९ ते दि.०२/१२/२०१९ पर्यंत मुदत दिलेली होती. दिलेल्या मुदतीत एकच ई-निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेली आहे. महराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि.२७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये पृष्ट क्र.१६ मुद्दा क्र.४.३ वर मूळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांबाबत निविदा उघडून प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करावी असे नमुद आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे फोल्डर क्र.१ व २ उघडले असता त्यात मक्तेदार श्री राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ४.६६% जास्तचे दर सर्वात कमी आले. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटीअंती निविदा रक्कमेवर ४% जास्तीच्या दरात सदरचे काम करण्यास लेखी संमती दिलेली असल्याने सदर कामी मक्तेदार श्री राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ४% जास्तीचे आलेले दर स्विकृत करुन

त्यानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.४२,५६,८६७/- मात्र चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- बालाणी भगतराम रावलमल**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** महानगरपालिका आरोग्य विभागाकडील कार्यरत कायम महीला व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेशाची शिलाई करुन पुरविणे कामी येणारा अंदाजित रक्कम रु.५,६५,३०४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.भगत बालाणी :-** संबंधित खाते प्रमुख आलेले आहेत का येथे याच्याबाबत संपुर्ण् माहिती द्यावी .

**श्री.चेतन सनकत :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** नाही यात आपण फक्त कापड खरेदी करतोय याच्यामध्ये शिलाई हा शब्द थोडी चुक झालेली आहे ती दुरूस्ती करावयाची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** याच्यामध्ये काय आहे की शिलाई चा संदर्भातील चुक आहे .

**मा.सभापती :-** दुरूस्ती करून घेण्यात यावी.

**श्री.नितीन लढढा :-** दुरूस्ती करून घेण्यात यावी व मान्य करण्यात यावा.

**श्री.भगत बालाणी :-** प्रस्ताव मान्य आहे , दुरूस्ती करण्यात यावी पुढील कार्यवाही करण्यात यावी .

**श्री.दिलीप पोकळे :-** आता जो गणवेशाचा विषय आहे आपण आरोग्य विभागावर वेगवेगळया प्रकारचा खर्च करतो त्याच्यानंतर आता मागील कागदपत्रे तपासुन मी आमच्या भागातील आहेत विकास पाटील साहेब यांना एक गोष्ट विचारली की रस्ते आणि गटार कीती आहेत म्हणजे पक्क्या व कच्च्या गटारी किती आहेत त्याची लांबी रूंदी किती आहे तर त्याचे कोणाकडेच मोजमाप नाहीये ते म्हणतात की आमच्याकडे रेकॉर्ड नाहीये जर त्यांच्याकडे रेकॉर्ड नाहीये तर मग ते सफाई कामगार कसे लावतात कायमचे किंवा रोजंदारीचे यांची नेमणूक कशी करतात माझ्या प्रभागात ४० कामगार सफाईचे आहेत तर ते ४० च का ४५ का नाही ३५ का नाही तर त्याच धोरण काय आहे ते सांगावे .

**श्री.विकास पाटील, आरोग्याधिकारी:-** आपण गटारींचे मोजमाप ठेवायला पाहीजे , सफाई कामगांराचे हे ठेवायला पाहीजे त्यात आपण काही भागात कच्ची गटार असेल किंवा पक्की असेल आपण दररोज काही साफसफाई करत नाहीत , गटार दोन चार दिवसांत आपण चांगली साफ करतो त्यानुसार कामगार आपण पुरविलेले आहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता माझा प्रभाग क्रं. १ आहे , तो प्रभाग २५ ते ३० वर्षापासुन आहे . पक्क्या गटारी किती आहेत आणि कच्च्या गटारी किती आहेत .

**श्री.विकास पाटील, आरोग्याधिकारी:-** नाही तशी आकडेवारी आमच्याकडे नाहीये, बांधकाम विभागाकडुन घेवुन देतो.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता जसे आपण निविदा काढतो त्यात गटारी कोण टाकतं. मागे आपण टेंडर काढले होते ४०० च कामगार का लागता आहेत ५०० का लागत नाहीत ३०० का लागत नाहीये .

**श्री.विकास पाटील, आरोग्याधिकारी:-** नाही आवश्यकते नुसार आपण करतो .

**श्री.नितीन लढ्ढा:-** पाटील साहेब निविदा काढतांना आपण लांबी रूंदी कशी व किती टाकतात

**श्री.दिलीप पोकळे :-** आता आपण टेंडर काढतो तर कश्या पध्दतीने काढतो . आपण कर्मचारी तिथे ठेवतोय तर मक्तेदाराचे कर्मचारी किती कायम किती कर्मचारी आहेत काय आहेत.

**श्री.विकास पाटील, आरोग्याधिकारी:-** आस्थापनावर जेवढे कर्मचारी आहेत तेवढे कायम कर्मचारी आहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** हो मग माझ्या प्रभागामध्ये पक्क्या गटारी किती आहेत आणि कच्च्या गटारी किती आहेत

**श्री.विकास पाटील, आरोग्याधिकारी:-** बांधकाम विभागाकडुन माहिती घेतो मी

**श्री.दिलीप पोकळे :-** तुम्ही सांगा भोळे साहेब .

**मा.आयुक्त :-** या संदर्भात ते अपुर्ण आणि चुकीची माहिती देताहेत किरंगे म्हणुन एक एस.आय आहे. तर त्यांनी त्यांच्या पुर्ण वॉर्डच नियोजन किती गटारी आहेत पक्क्या किती आहेत कच्च्या किती आहेत त्याच्याप्रमाणे मॅन पॉवर किती लागणार आहे आणि या सुचना उपायुक्तांनी त्यांना दिलेल्या आहेत . आणि माझ्या समोर हे सगळे झाले की प्रत्येक एस.आय चे हे सगळं पाहीजे तरचं तुम्हाला हे होईल. म्हणजे नजर अंदाज केलं म्हणुन हे केलं हे चुकीचं आहे पुढच्या आठ दिवसाच्या आंत पुर्ण एस.आय यांचेकडुन माहिती घेवुन सभागृहापुढे सादर करावे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका आरोग्य विभागाकडील कार्यरत कायम महीला कर्मचाऱ्यांना साडया व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेशाचे कापड महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंत नगर घाटकोपर, मुंबई यांचे कडुन वार्षिक दर कराराने खरेदी कामी येणारा अंदाजित रक्कम रु.५,६५,३०४/- मात्र चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ (२)(२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ४:-** स्थायी समिती ठराव क्रं.२०५ दि.२०/१२/२०१९ अन्वये तहकूब विषय:**-** प्रभाग समिती क्रं.०३ मधिल मालमत्ता कर वसुली झोन क्रं.४ कार्यसनातील मिळकतधारक तसलीम खान लतीफ खान यांचे कडेस असलेली रक्कम रु. २१३६०/- व श्री.वसंत रामु नाईक (सुनिल वसंत वंजारी) रा.मेहरुण यांचे कडेस असलेली रक्कम रु.८९६०/- मात्र पाणीपट्टीची रक्कम मनपा अधिनियमाचे कलम १५२ अन्वये निर्लेखीत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सदरचा विषय मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये आपण तहकुब ठेवलेला होता अपुर्ण माहिती अभावी संबंधित कर्मचारी आणि अधिकारी यांच्याकडुन माहिती घेतली असता आपण यापुर्वी अश्या प्रकारचे रकमा निर्लेखित केल्या आहेत असे आढळुन येते , परंतु आपण या रकमा निर्लेखित करत असतांना मागे किती वर्ष गेले पाहीजे यासाठी काही नियम वगैरे मला दिसुन येत नाही . तर त्यासाठी प्रशासनाचा हा प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही . परंतु यापुढे आपण मागे किती वर्ष गेले पाहीजे निर्लेखित करण्यासाठी यासाठी आपण काहीतरी नियम केला पाहीजे असे मला वाटते .

**मा.आयुक्त :-** अतिशय चांगला सल्ला आहे. पण या संदर्भात थकबाकी या वेगवेगळया प्रकारच्या असु शकतात . एखादयाने जर नळ कनेक्शन घेतले नाही आणि त्याची बाकी पुर्ण निघाली तर ते ज्या तारखेपासुन आहे असे आपल्याला घ्यावे लागेल , ज्यावेळेला आपण एखादी गोष्ट निर्लेखित करतो तर त्याचा अर्थ असा नाही की सगळे दिलेले आहे जर तो माणुस भरू शकत नाही किंवा असे काही रकमा आपण ते वसुल करू शकत नाही तर अश्या काही आपल्या केलेल्या मिस्टीक मुळे किंवा ते प्रत्यक्षात आहे तर ते आपल्याला ते त्या तारखेपासुन करावे लागेल. आणि दुसरे जे काही क्लॉज आहेत तर त्याला आपण साधारणत: तिन किंवा पाच वर्षे मागे गेले पाहीजे.

**श्री.भगत बालाणी :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, १) प्रभाग समिती क्रं.३ मधिल मालमत्ता कर वसुली झोन क्र.४ कार्यसनातील मिळकतधारक तसलीम खान लतीफ खान रा. मेहरुण जळगांव यांची मिळकत मागणी रजिस्टर अ.नं.०१ पा.नं.७७ वर नळ संयोजनाची नोंद आहे. त्यानुसार अर्जदार यांना घरपट्टी पाणीपट्टीसह मागणी निर्गमित करण्यात येत आहे. सन २०११/१२ ते सन २०१९/२० अखेर पाणी पट्टीची रक्कम शास्तीसह एकुण रु.२१,७२७/-मात्र थकबाकी होते. अर्जदार यांनी सन २०१९/२० या आर्थिक वर्षात पावती क्र.१३९ दि.०४/०५/२०१९ अन्वये रुपये ३६७/- मात्रचा फक्त मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे उर्वरीत रक्कम रु.२१,३६०/- मात्र पाणी पट्टीची रक्कम मालमत्ता कराच्या मागणी रजिस्टरला थकीत दिसुन येत आहे. अर्जदार यांनी मिळकतीमध्ये नळ नसलेबाबत अर्ज दिलेला होता त्यानुसार क.अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचे अहवालानुसार अर्जदार यांचे मिळकती मध्ये नळ संयोजन नसलेबाबत अहवाल दिलेला आहे.

२) प्रभाग समिती क्रं.३ कार्यक्षेत्रातील मेहरुण येथील रहिवासी अर्जदार श्री.वसंत रामु नाईक (सुनिल वसंत वंजारी) रा.मेहरुण मालमत्ता क्र.C४-५७ मालमत्ता मागणी रजिस्टर वर दोन नळ संयोजनाची नोंद असुन अर्जदार यांनी एका नळ संयोजनाची रक्कम आज पावेतो भरणा केलेला आहे. मात्र एका नळाची

रक्कम रु.८९६०/- अर्जदार यांचेकडेस थकबाकी आहे. सदर प्रकरणी क.अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचे अहवालानुसार अर्जदार यांचे मिळकती मध्ये एकच १/२" नळ संयोजन असले बाबत नमुद केले आहे.

सदरचे अहवाला नुसार प्रभाग समिती क्रं.३ कडील यु.क्र.०३/०४ मधील तसलीम खान लतीफ खान रा.सि.स.नं.४१, मेहरुण जळगांव यांचे मिळकतीमध्ये १/२" नळ संयोजन नसल्याने त्यांचेकडेस सन २०१९/२० अखेर असलेली पाणी पट्टीची रक्कम शास्ती सह एकुण रुपये - २१,३६०/- मात्र तसेच प्रभाग समिती क्रं.३ कडील यु.क्र.०३/०४ मधील श्री.वसंत रामु नाईक (सुनिल वसंत वंजारी) रा.मेहरुण गावठाण जळगाव यांचे मिळकतीमध्ये एकच १/२" नळ संयोजन असल्याने त्यांचेकडेस सन २०१९/२० अखेर असलेली पाणी पट्टीची रक्कम शास्ती सह एकुण रुपये - ८,९६०/- मात्र अशी दोन्ही मिळकतींवर सन २०१९/२० अखेर आकारलेली पाणीपट्टीची एकुण रक्कम रु.३०,३२०/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ अन्वये निर्लेखीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र यानंतर रक्कमा निर्लेखित करणेआधी मागील किती वर्षा पूर्वीच्या थकीत रक्कमा निर्लेखित करता येतात याची प्रशासनाने खात्री करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- बालाणी भगतराम रावलमल**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागाकडिल दि.३०/१२/२०१९ ते दि.०४/०१/२०२०, अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी अहवालाची माहिती घेणे.

**श्री.भगत बालाणी :-** लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेतली .

**श्री.चेतन सनकत :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.३०/१२/२०१९ ते दि.०४/०१/२०२० अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ६:-** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२९/१२/२०१९ ते दि.०५/०१/२०२०, दि.०६/०१/२०२० ते दि.१२/०१/२०२०, या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आगीचे अहवालांची माहिती घेतली.

**श्री.सुनिल खडके :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२९/१२/२०१९ ते दि.०५/०१/२०२०, दि.०६/०१/२०२० ते दि.१२/०१/२०२० या कालावधीत लागलेल्या

आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- जादा विषय क्र. १:-** जळगांव सि.स.नं.१९६३/ब नेरीनाका जवळील वैकुंठधाम स्मशान भूमीत केशवस्मृती प्रतिष्ठान जळगांव यांनी लोकसहभागातून स्वखर्चाने आधुनिक शवदाहीनी पुरविणे, बसविणे व देखभाल दुरुस्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.रेश्मा काळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**सौ.रेश्मा काळे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझा एक विषय आहे निश्चित पणे अश्या संस्थांचे अभिनंदन करायला पाहीजे परंतु या संदर्भात से की यांची विद्युत दाहीनी किंवा गॅस वर चालणारी दाहीनी हे तिथे प्रस्तापित करतील आणि त्याची देखभाल व दुरूस्ती सदरहु संस्था करणार आहे. अत्यंत चांगला विषय आहे, परंतु याच अनुषंगाने महापालिकेचा तिथे जो काही हे आहे ती जर का देखभाल व दुरूस्ती या संस्थेने स्विकारली तर तश्या पध्दतीचा एक विनंती प्रस्ताव आपण मा.सभापती महोदया आपण स्थायी समिती सभापती या नात्याने जर कधी दिला मला वाटते की त्यांना विनंती केल्यास केशव स्मृती प्रतिष्ठान ही अत्यंत चांगले काम करणारी संस्था आहे. आपण आपल्या स्मशानभुमिची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिकेच्या माध्यमातुन करतोच , परंतु कसे आहे की खुप छोटया छोटया गोष्टी असतात तिथे कि एखादे प्रेत दहन झाल्यानंतर त्याच्यावरील कपडे किंवा ते बांबु असेल किंवा त्या गवत असेल तर ते दुसऱ्या दिवसापर्यंत आपले स्वच्छता कर्मचारी जाणार नाही तो पावेतो ते त्या ठिकाणी तिथेच पडलेले राहील , त्याच्या नंतर अतिम संस्कारासाठी दुसरे जे नागरीक येतात त्या वेळेला जे चित्र आहे ते डोळयांना काही फारसे काही चांगले दिसत नाही .खुप मोठी जबाबदारी आहे अश्यातलाही काही भाग नाही . परंतु तिथे कायम स्वरूपाचा कर्मचारी असला की एकाचे प्रेत दहन झाल्यानंतर व ते गेल्यानंतर अर्ध्या तासामध्ये स्मशानभुमिची स्वच्छता करून घेतली तर कमीत कमी नंतरच्या येणाऱ्या नागरीकांना डोळयांनाही चांगले दिसेल आणि तो जो बगीचा आहे तिथे त्याला पाणी घालणे , उन्हाळयामध्ये अशी परिस्थिती असते की प्रत्येक उन्हाळयामध्ये तिथले झाडे सुकले जातात तिथे आपली पाण्याची टाकी आहे, तिथे बोरींग ची व्यवस्था केलेली आहे , म्हणजे सगळया व्यवस्था असुन सुध्दा छोटयाश्या दुर्लक्षामुळे त्या स्मशानभुमिला कुठेतरी अवदसलेले कुठेतरी दिसते . तर आपण या संस्थेला विनंती करावी की त्यांनी संपुर्ण स्मशानभुमिची देखभाल व दुरूस्ती त्या संदर्भात जर का काही खर्च सुध्दा अपेक्षित असेल तर तो जरी आपण स्विकार केला तर मला तरी फार काही फरक पडणार नाही . जे कर्मचारी आता आपण नेमणुक करतो त्या कर्मचाऱ्यांच्या पगारा ईतके अनुदानही त्या संस्थेला दिले तर मला वाटते की त्याची निगा ही योग्य पध्दतीने राखली जाईल , कारण आपण बघतो बेंचेस आहेत त्या बेंचेस वर खुप प्रमाणात धुळ साचुन राहते , ज्यावेळेला एखाद्या अंतिम संस्काराला नागरीक येतात व ते तिथे बसतात तर त्यांना त्या सर्व धुळीमध्ये बसावे लागते तर हया छोटया छोटया गोष्टी आहेत .

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपण सुचविलेला विषय अतिशय चांगला आहे , आणि मला हा विषय सांगायला आनंद वाटतो की ज्यावेळेला आम्ही पाहणी करायला आम्ही तिथे गेलो होतो त्यावेळी आयुक्त साहेबांनी त्यांना फक्त तोंडी विनंती केली की , तर आपण हे करीत आहात तर आपणच येथे सिसिटीव्ही बसवुन द्यावे ती त्यांनी ताबडतोब मान्य केली आणि या याच्यात ते आपल्याला सिसिटीव्ही बसवुन देत आहेत आणि त्यांची जी गॅस दाहीनी असेल त्याच भागात नाही तर संपुर्ण परिसरामध्ये बसविणार आहे तर तो प्रस्ताव सुध्दा आपण त्यांना पाठवु आणि बघु त्यावर कसे वर्कआऊट करता येईल .

**मा.आयुक्त :-** मागे एक केस झाली होती , म्हणुन मी त्यांना म्हणालो की सिसिटीव्ही बसवुन द्यावे आणि ते त्यांनी मान्य केले आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** अतिशय चांगली अशी दुरदृष्टी घेतली त्याबद्दल अभिनंदन आपले , त्या डॉक्टर अश्या होत्या रात्री बेरात्री त्या पोस्टमार्टेम साठी यायच्या जर त्यांना अडचण असली तर त्या आमच्या सारख्यांना सांगत होत्या भाऊ तुमच्याजवळ गाडी आहे का पाठवुन द्या मी येते , अश्या डॉक्टर जेव्हा पासुन मुकल्या तेव्हा पासुन कोणीही संध्याकाळी रात्री ते काम करत नाहीये आपण हे जर केले तर चांगले राहील.

**मा.आयुक्त :-** आता आपण हे जर केले तसेच आपल्याकडे दोन बायोगॅसचे प्रोजेक्ट डिपीआर मध्ये आहेत जर आपण त्यांना जागा उपलब्ध करून दिली आणि तिथे सिंडीकेटेड बेस झाला आणि आपण जर हा प्रोजेक्ट पुर्ण केला तर याला सुध्दा ती एनर्जी मिळु शकेल आणि त्याची कॉस्ट सुध्दा कमी होईल .

**मा.सभापती :-** त्याची कॉस्ट सुध्दा कमी होईल .

**मा.आयुक्त :-** तर तो विचार आपल्याला ईथे करता येईल .

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या संदर्भातील आपण एक धोरणात्मक निर्णय घेवु या व त्या संदर्भात एक आपली कृषि उत्पन्न बाजार समिती जवळ आहे आणि कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये मोठय प्रमाणात ओला भाजीपाला निघतो म्हणजे ते त्यांना ट्रान्सपोर्टटेशनला सुध्दा जवळ पडेल आणि एनर्जी जनरेट होईल म्हणजे याच्यावर सुध्दा संस्थेला खर्च कमी लागेल . याच संदर्भातील एक प्रस्ताव केशव स्मृती प्रतिष्ठान ने मागच्या वेळी दिलेला होता .

**मा.सभापती :-** त्याच्यावरही सहया झालेल्या आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते की त्याचे डॉकेटही तयार असेल तो बोळीचा प्रस्ताव आहे .

**मा.सभापती :-** हो बोळीचा झालेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** झालेला असेल तर पुढच्या स्थायी समिती मध्ये ठेवा किंवा आता तयार असेल तर घेवुन टाका ना .

**श्री.विष्णु भंगाळे :-** असेल तर दाखवा ना साहेब म्हणजे पुढच हे करता येईल व माहिती ही होवुन जाईल .

**मा.आयुक्त :-** प्रस्ताव तयार आहे पुढच्या स्टॅंडींग पुढे ठेवु.

**श्री.दिलीप पोकळे :-** जळगांव मध्ये भरपुर ठिकाणी अश्या बोळी आहेत तर त्यावर नगररचना विभागाचा अभिप्राय घेवुन ते करावे .

**मा.आयुक्त :-** नाही नगररचना चा अभिप्राय घ्यायची आवश्यकता नाही कारण काय आहे तर त्याचे फर्स्टसेशन होणार नाहीये आणि म्हणुन आपण ठरवायचे आहे की द्यायचे की नाही कारण हे आहे आणि तेच आपण हे करायचे .

**श्री.विष्णु भंगाळे :-** ते स्वच्छता करून पार्कींग करणार आहेत .

**मा.सभापती :-** ते मालकी वगैरे असे काही होणार नाहीये फक्त पार्कींग चा विषय ठेवु .

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो दोन मिटरचा रस्ता आहे आणि यांची जी संस्था आहे केशव स्मृती प्रतिष्ठान व माधवराव गोळवलकर रक्तपेढी यांच्या बऱ्याचश्या दुचाकी त्या रस्त्यावर उभ्या राहतात त्याच्याने मुख्य रस्ता ब्लॉक होतो आणि आज आपण तिथली परिस्थिती बघाल तर उघडया डोळयांनी पाहीली जावु शकत नाही ईतकी तिथे दुर्दशा झालेली आहे की संपुर्ण आता मागच्या १५ दिवसांपासुन आरोग्याच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन स्वच्छता केली आहे आणि आपण याच्यामध्ये त्याठिकाणी ओव्हर ब्लॉग लावुन ती वापरण्या संदर्भात सुध्दा सगळयांना सोईची असेल आणि या ज्या काही टुव्हिलर असतील म्हणजे त्या संस्थेच्याच नाही तर त्या परिसरातील आजुबाजुच्या कोणाच्या टुव्हिलर असतील त्या लावुन वाहतुकी ची एक सुविधा होईल म्हणजे दोन्हीही प्रपोज आपले साध्य होणार मग महानगरपालिकेला एक रूपायाही लागत नाहीये आणि शिस्तही लागेल .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बांधकाम विभागाकडे विचारयचे आहे, शिवाजी नगर उड्डाण पुल बांधण्याच्या पुर्वी आजच्या दिड ते दोन वर्षापुर्वी आपल्या जळगांव शहर विकास आराखडया नुसार मंजुर डिपीआर नुसार ३५९९७३८/- सीआर १४२ एल व्ही-९ मधील शेत क्रं. २/२/३ हा नियोजीत असा २४ मिटरचा रस्ता होता आव्हाणे रोडवरील त्याची साहेब आपण दिड वर्षापुर्वी पाहाणी केली होती पुलाच्या आधी त्यावेळी त्या पुलाची पाहाणी करायला जिल्हाधिकारी साहेब आले होते , त्या रोडाच्या संदर्भात तुम्हाला सांगीतले होते संबंधितांना पाहाणी करून नोटीसा देवुन ताब्यात घ्यायला लावा काही रस्ता आपल्या ताब्यात आहे काही पुढचा ताब्यात घ्यायचा आहे . तो रस्ता झाला असता तर आपला प्रॉब्लेम स्वॉल्व झाला असता , आज तुम्ही आसोदा गेट कडील रस्त्याचे पत्र दिले पण हे लोकं काय करतात याच्या आधी दिड वर्षापुर्वी म्हणजे ईथे प्रॉब्लेम आला की तुम्ही तिथे स्पॉट वर जाता आणि तिथे दिड वर्षापासुन हे लोकं झोपले होते का काय करतात हे लोकं म्हणजे आज परिस्थिती खराब आहे साहेब म्हणजे आज असेच करता आपण ठराव टाकला की पर्यायी रस्ते द्या तोपर्यंत काही झालेले नाही तो रस्ता झाला नाही आज शिवाजी नगरवाले भोगुन राहीले आता रेल्वे गेट बंद झाले तर मग आसोदा वाल्यांनी जायचे कुठुन म्हणजे किंवा शिवाजी नगर ओलांडुन जायचं आणि याच्या दिड ते पावणे दोन वर्षापासुन मध्ये कलेक्टर साहेब यांनी स्वत: पाहणी केलेली होती , आसोदा गेटची , १८ मिटर रस्त्याची व २४ मिटर रस्त्याची आणि सर्वे नं.२०१ , ३०१ ३२८ आणि ३५३ ,३५२ ,३५१,३४९,३४८ , ३४४,४१६,३४५,४१५,४१४,४१३ अश्या २४ मिटरचा रस्ता आहे तो त्यावेळेला या लोकांनी लक्षात घेतले असते तर आज ऐवढे प्रॉब्लेम वाढले नसते साहेब आज जर तुम्ही पाहणी करायला गेले तर तिथे काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे काही परत बिल्डिंग बांधलेल्या आहेत. म्हणजे आपण जर गेलो तर डोकेदुखी होईल. आज जर काही झाले तर काय होईल म्हणजे अधिकारी लोकं काय करताहेत त्यावेळेला म्हणजे आम्ही रेकॉर्डवर सांगीतले माणसांनी पण सांगीतले , नगरसेवकांनी सांगीतले तरी हे दोन वर्षापासुन त्याचा एकही पाठपुराव केलेला नाही .

**मा.आयुक्त :-** उद्या जर आपण सगळयांनी मिळुन जर पुढाकार घेवुन हे नक्की केले तर हे शक्य होईल नोटीस देणे हे महिन्याभराचे काम आहे . पण लॅन्ड प्रासेस मध्ये टाकल्यानंतर त्याचा पैसा आपण कश्याप्रकारे ऊभा करू हा बेसीक प्रश्न आहे , पैशांची मागणी वगैरे मला वाटते काही काम नाही .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब आता निधी उपलब्ध आहे की नाही पण हे तुम्ही आज सांगाताहेत .

**मा.आयुक्त :-** शेख काय आहे याचा खुलासा करावा.

**श्री.शेख, सहा.नगररचनाकार :-** साहेब रिंगरोड जवळचे काही ले आऊट आलेले आहे आपल्याकडे जे प्रस्ताव आलेले आहेत आणि त्यांचे कामे घेतलेले आहे. परंतु ज्या भागाचे ले आऊट झालेले नाही ते आपल्याला करावे लागेल .

**मा.आयुक्त :-** नाही पहिल्यांदा मी परवा सांगीतले की हे रोडची मार्कींग करून घ्या, म्हणजे काय होईल .

**श्री.शेख, सहा.नगररचनाकार :-** सर तो रस्ता २४ मिटरचा आहे .

**मा.आयुक्त :-** नाही असु दयाना त्याची मार्कींग करून घ्याना .

**श्री.शेख, सहा.नगररचनाकार :-** हा सर करून घेतो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमळनेर गेट ते शिवाजी नगर स्मशानभुमि एवढे अतिक्रमण वाढले आहे साहेब की त्या अतिक्रमणामुळे वाद झाला रेल्वेस्टेशनच्या जवळ तिथ जो वाद झाला तो हिदु - मुस्लिम चे वाद झाले त्याठिकाणी आमचे संबंधित नगरसेवक यांचे त्यात नांव टाकले गेले तो माणुस तिथे नव्हता या अतिक्रमणवाल्यांना तुम्ही सांगा तिथे बेफाम धंदे चालु आहेत व बेकायदेशीर आहेत , तुमच्याच . . .

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये दोन गोष्टी लक्षात आल्या अतिक्रमण तर आहेच पण त्याठिकाणी लाईटची एक गरज आहे ते मी पाहील्यानंतर माझ्या लक्षात आले आणि तो संपुर्ण रस्ता रिक्षा ज्या आहेत ते म्हणजे त्यांच्या मुळे समोरचा पुढे लावतो व रस्त्यावर जायला जागा नसते व रस्त्यावर लावली की तो वादाचा विषय होतो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पाईप पण पडलेले आहेत साहेब त्याठिकाणी .

**मा.आयुक्त :-** नाही पाईप वगैरे नाहीत .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो साहेब पाईपपण आहेत त्याठिकाणी .

**मा.आयुक्त :-** मुठे साहेब पोलीसांसोबत कार्यवाही करा त्याठिकाणी कारण तो स्पॉट आहे आणि अतिक्रमण व लाईट ची गरज आहे साळुंखे तिथे लाईट लावावे .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** रोडर करीता प्रभागामध्ये वाहनाची गरज आहे आता परवाच माझ्या प्रभागामध्ये मागविली तर वाहन व्यवस्था नाही ते रोडर घंटागाडीवर पण बसत नाही , कर्मचारी नाही , ड्रायव्हर नाही मग साहेब आपण आता दिड - दिड लाखांच्या मशिनरी आणल्या आहेत त्या भंगार मध्ये ठेवायच्या का .

**मा.सभापती :-** विकास पाटील साहेब अश्या प्रकारच्या सुचना येता आहेत व आपल्याला सांगावे लागते आहे हे काय आहे.

**श्री.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** आजच सकाळी ट्रक्टर मध्ये मशिन लावुन पोहोचविलेले आहे , आपण स्पेशल ऑर्डर केली आहे त्याची एक वाहकाची आणि एक ड्रायव्हरची .

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही रोडर मशिन चालु आहे का , कंडीशन मध्ये आहे का .

**श्री.विकास पाटील , आरोग्याधिकारी :-** हो मग नविन मशीन आहे .

**मा.सभापती :-** नविन मशीन आलेले आहे. रोडर मशीन हे हैवी आहे व त्याच्या सोबत एक माणुस असणे अत्यावश्यक आहे आणि गाडी असणे सुध्दा त्यासाठी आवश्यक आहे आणि आपण याची काळजी घ्यायची आहे कारण आपण ही मशिनरी घेतो आणि ती नंतर भंगार मध्ये जाते त्याचा काहीही वापर न करता .

**मा.आयुक्त :-** त्याची पुजा वगैरे ठेवा म्हणजे आपल्या सगळयांना कळेल .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगर शौचालयाचे काय झाले त्याची वर्कऑर्डर घेवुन ठेकेदाराने अजुन काम सुरू केलेले नाही तसेच शिवाजी नगर मध्ये नविन शौचालय बांधणार होते त्याची ही वर्कऑर्डर निघुन गेली आहे तरी त्या ठेकेदाराने अजुन काम सुरू केलेले नाही .बांधकाम वाले काय लक्ष देता याच्यावर वर्क ऑर्डर निघुन गेल्या आहेत .

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** सभापतीताई मध्यंतरी आरोग्य विभागाने आयुक्त साहेबांकडे एक अहवाल सादर केलेला होता की आता आपल्याकडे ज्या काही सार्वजनिक शौचालय अस्तित्वात आहेत तर त्यांचे वापरण्याचे प्रमाण फार कमी झालेले आहे तर त्याच वेळेस आपण या वर्कऑर्डर ईश्यु केल्या होत्या तर साहेबांनी सांगीतले की त्यांचा पुन्हा अहवाल घ्या आरोग्य विभागाचा की तुम्हाला कुठल्या कुठल्या आवश्यक आहेत त्या आपण पुर्ण करू . तसा आपण त्यांच्याकडे अहवाल सादर केलेला आहे की आपण हे शौचालय मंजुर केलेले आहेत यापैकी कुठले गरजेचे आहेत व म्हणसजे त्या आम्हाला त्वरीत चालु करता येतील , राहीला विषय भाऊंच्या वॉर्डाचा तर मी हमाल वाडयाचा मी त्यांना दोन दिवसांपुर्वीच सांगीतले की काम सुरू करून टाका कारण की व त्यांचा अहवाल येत राहील ते आवश्यक आहे म्हणजे पुर्ण अहवाल जो आहे तो आतापर्यंत याच्याकडुन आलेला नाहीये.

**मा.सभापती :-** या आठवडयात ते काम सुरू करून टाका .

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** ताई आपल्याला जो अहवाल पाहीजे आहे तो यांच्याकडुन आलेला नाहीये व सरांनी सांगीतले होते की यांचा अहवाल आल्यानंतर तुम्ही पुढील कार्यवाही करा.

**मा.सभापती :-** साहेब हा अहवाल कधीपर्यंत येईल

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांच्याकडुन लिखीत मध्ये घ्या, म्हणजे पुढच्या मिटींगमध्ये पुन्हा हा विषय येईल पाटील साहेब हा अहवाल कधी जाईल हे लिखीत मध्ये देवुन टाका

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** संडासीबाबत त्यांना माहिती पाहीजे .

**श्री.विष्णु भंगाळे :-** पुर्ण माहिती त्यांना पाहीजे

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म्हणजे वर्कऑर्डर दिल्या गेल्या व महापालिकेने संडाशी तोडुन द्यायच्या आहेत आपण ठेकेदार करणार नाही त्याकरीता तो वेळ लागतो आहे भोळे साहेब बरोबर आहे का त्याला दोन महिने झाले आहेत वर्कऑर्डर देवुन , कारण जेसीबीच नाही आपल्याकडे उपलब्ध कारण सेप्टीक टँकचा उपसा करणे व तोडुन त्याला ताब्यात देणे तेव्हा तो बांधकाम करेल आणि दवाखान्याचे काय झाले वर्कऑर्डरचे ते पण सांगा .

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** कालच ते येवुन भेटले व ते म्हणाले की त्या कामाचा आणि हया पेमेंटचा काहीही संबंध नाही .

**मा.आयुक्त :-** हे जर काल केले असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त साहेब जाता जाता सगळयांचे देवुन टाका .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगरचे एक बाकी आहे दोन एक लाखाचे आहे ते देवुन टाका.

**श्री.दिलीप पोकळे :-** साहेब आपला वर्कऑर्डर हा जो शब्द आहे तर आपण त्याला कामाची विनंती असे करता येईल का कारण वर्कऑर्डर तर हा आदेश आहे तो कार्यादेश आहे. हे आपण समजु शकतो. लोकांकडुन घेतलेले पैसे आपण लोकांसाठी वापरायचे आहे .

**मा.आयुक्त :-** मनपा निधी आहे मनपा निधी आल्यानंतर काम पुर्ण झाल्यानंतर त्याला पेमेंट द्यायची जबाबदारी सुध्दा आपली आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** साहेब मी तेच म्हणतो की आपण जर वर्कऑर्डर च्या ऐवजी जर विनंती पत्र जर आपण केले तर बर होईल असे मी म्हणत होतो.

**मा.आयुक्त :-** मनपा निधी मध्ये कार्यादेश देणे म्हणजे ती विनंतीच असते , कारण आपण कार्यादेश देतांनाच असे म्हणतो की निधीच्या उपलब्धतेप्रमाणे पेमेंट अदा केले जाईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृत योजनेच्या संदर्भात आज पेपर मध्ये आले आहे आणि ते म्हणतात की त्यांना दंड मान्य नाही. मग आता तो काम सोडुन गेला की परत खड्डे होतील परत कायदेशीर वाद होतील तर त्याला कोण जबाबदार राहील.

**मा. सभापती :-** प्रशासन याच्याबद्दल कार्यवाही करेल पेपरवरच्या बातम्यांवर विश्वास ठेवुन कार्यवाही करता येत नाही.

**श्री.योगेश बोरोले , प्रकल्प अभियंता :-** त्यांनी जे ६ लाईनचे केलेले आहे तर ते आपण त्यांना दिलेले आहे. आणि त्यावर आपण त्यांचा खुलासा घेतलेला होता की हे काय आहे व याच्याबद्दल तुमचे काय म्हणणे आहे. त्यांचे म्हणणे आलेले आहे व आपण ते मजिप्रा ला कळविलेले आहे आणि मजिप्रा ने अभिप्राय दिल्यानंतर आपल्याला पुढील कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :-** त्यांच्याकडील अभिप्राय आल्यानंतर आपण सभागृहाला अवगत करून द्यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म्हणजे अध्यक्ष महोदय त्यांचे म्हणणे असे आहे की ७ कोटींचा दंड भरणार नाहीत असा खुलासा आला आहे का .

**मा.आयुक्त :-** मध्यंतरी असे लक्षात आले होते की काही चुका नसतांना काही अमाऊंट त्यांना दिलेली आहे. त्यावर ही त्यांचे म्हणणे ऐकुन घेतलेले आहे.आणि मुदत वाढ जी द्यायची आहे तर ज्या गोष्टींला ते जबाबदार नाहीयेत जे काही करणे अपेक्षित आहे. तर तो भाग वगळुन त्यांना आपल्याला मुदतवाढ द्यावी लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लवकर लक्ष घालुन करून घेण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** दुरूस्ती साठी तो काय प्रकार आहे.

**श्री.योगेश बोरोले , प्रकल्प अभियंता :-** तसे काही नाहीये आपल्याकडे दुरूस्तीची दुसरी तरतूद आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्या संदर्भातील जो निधी मंजुर करण्यात आलेला आहे त्याच्यातुन खर्च होवुन काही निधी शिल्लक पडणार आहे का .की त्याच्यातुन आपण रस्ते दुरूस्ती करू शकतो .

**श्री.योगेश बोरोले , प्रकल्प अभियंता :-** नाही आपण जेवढे पण पाईपलाईन करीता खोदणार आहे आणि रस्ते दुरूस्ती करणार आहोत त्याच्यावर संपुर्ण खर्च होणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय , आरोग्याच्या संदर्भामधील विषय होता आपल्या सतरा मजलीच्या खाली गोलाणी मार्केट च्या मागील गल्लीतील सर्व ड्रेनेजचे स्लॅब तुटलेले आहे. आणि त्याच्यामध्ये तिथे सातत्याने भाजी बाजार व नारळ वाले आहेत तर ते नारळ त्याच्यामध्ये पडुन साधारणत: आठवडयातुन ती तिन ते चार वेळा चोकअप होते .आणि

चोकअप झाल्यानंतर संपुर्ण पाणी त्या मार्केटच्या तळघरामध्ये साचुन जाते . आणि कर्मचाऱ्यांना सुध्दा सात ते आठ फुट खाली उतरुन ते चेंबर रोज साफ करावे लागतात ईतकी वाईट परिस्थिती तिथे आहे तर या अनुषंगाने आरोग्य विभागाने ते चेंबर दुरूस्त करून ते नव्याने बांधण्याच्या संदर्भातील प्रस्ताव त्यांनी पाठविलेले आहे. तर ते तातडीने काम सुरू करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** मी तिन ते चार मिटींग आधी या चेंबरच्या बाबतीतील सुचना मांडलेली होती आणि आपल्याकडुन असे सांगण्यात आले होते की पुढील मिटींगच्या आधी ते चेंबर करण्यात येईल.आणि आज ते ओपन आहे ओपन असल्यामुळे नारळ त्याच्यामध्ये पडतात .माणसही पडतात त्याच्यावर आजपर्यंत काय झाले.

**श्री.सुनिल भोळे , शहर अभियंता :-** सदरचे प्रस्ताव मान्यते साठी ठेवण्यात आलेले आहे काल साहेबांनी त्याला मान्यता दिली आहे त्यांना वर्कऑर्डरही देण्यात आलेली आहे. बर याच्याबद्दल एक सांगायचे आहे आपण दोन वर्षापुर्वी पुर्ण ते रिपेअर करून क्लोज केलेले होते , दोन वर्षामध्ये त्या ठिकाणी ज्या ट्रक येतात . . .

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या ट्रकांना बंदी करा , होते काय आहे की तिथे नारळाच्या मोठमोठया ट्रक्स येतात आणि त्या ट्रकमुळे ते चेंबर तुटतात कारण त्या सगळया गाडया ओवरलोड असतात एकतर त्यांना बंदी घाला किंवा वाहन धारकांनी ती जबाबदारी स्विकारली पाहीजे की त्यांच्या वाहनांमुळे ते तुटले तर ती त्यांनी तिथे दुरूस्ती करायला पाहीजे.आणि आत्ता अतिक्रमणच्या संदर्भातील विषय झाला आहे अतिक्रमण ची समस्या ही फक्त शिवाजी नगरच्या भागासाठीच मार्यादीत नाहीये संपुर्ण जळगांव शहराची अतिक्रमण व्यवस्था जी आहे. ती अत्यंत भयावह परिस्थिती मध्ये आहे. मी मुठे साहेबांचे अभिनंदन करतो त्यांनी ज्यावेळेला कार्यवाहीला सुरूवात केली आणि आता आपण परवा वृत्तपत्रामध्ये बातमी वाचली की एक अतिक्रमण धारकाने त्यांना लाच देणेचा प्रयत्न केला आणि त्यांनी लाच देणाऱ्या अतिक्रमण धारकाच्या संदर्भात गुन्हा दाखल करण्याची पावले उचलली आहे. तर अशा पध्दतीने संपुर्ण सभागृहातील सदस्यांनी प्रशासनाला फ्रीहॅन्ड काम करू देण्याच्या संदर्भातील जर का भुमिका स्विकारली व सदस्यांनी शहरात अतिक्रमण कुठे आहे त्याच्या संदर्भातील तक्रारी प्रशासनाकडे कराव्यात परंतु एखादे अतिक्रमण सोडावे किंवा एखाद्या अतिक्रमण धारकाला अभय द्याव अशा पध्दतीच्या सुचना नाही केल्या तर मला वाटत मुठे साहेब तर दोन महिन्यामध्ये कदाचित संपुर्ण जळगांव शहरातील अतिक्रमणाचा विषय योग्य पध्दतीने हाताळु शकतील अशी त्यांची कार्यपध्दती याच्यावरून दिसुन येते आहे.

**मा.आयुक्त :-** अतिक्रमण च्या बाबतीत शिवाजी नगर जवळील भाग तर त्याठिकाणी आता पुन्हा अतिक्रमण वाढायला लागले आहे. उपायुक्त आणि खान हे आत्ताच जर गेले तर होईल नाहीतर संपुर्ण एक लाईन बसुन जाईल .

**श्री.नितीन बरडे :-** अग्निशमन च्या गाडयांचे काय झाले ?

**श्री. पंकज पारीक, वाहन व्यवस्था प्रमुख :-** गाडयांचा पहिला टप्पा झालेला आहे आणि दुसरा व तिसरा टप्पा बाकी आहे तो लवकरच होईल.

**मा.सभापती :-** गाडयांची मुदत मार्च पावेतोच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आता उन्हाळा लागुन जाईल. महाबळ स्टेशन मध्ये एकही गाडी नाहीये तिथं एक फोर व्हिलर लागली आहे झाकुन .

**मा.उपायुक्त , सार्व. आरोग्य:-** अग्निश्मन विभागाच्या गाडयांची ४० ते ४५ टक्के पुर्ण बांधणी झालेली आहे जो आपण पहिला टप्पा केलेला होता . दुसरा टप्पा पुढच्या पंधरा दिवसांत होईल तो ८० टक्क्यांचा आहे आणि एक महिन्यापर्यंत संपुर्ण बांधणी पुर्ण होईल , आरटीओला पासिंगला साधारण १५ दिवस लागतील म्हणजे साधारण १५ मार्च पर्यंत त्या आरटीओ पासिंग होईल .

**श्री.नितीन बरडे :-** नाही पण महाबळ स्टेशन का बर बंद केलेले आहे. सद्या तिथे कोणीच नाहीये .

**श्री.बारी , अग्निशमन अधिकारी :-** आता २६ जानेवारी होती व विविध प्रकारचा जो लोड येतो त्यामुळे सगळया कर्मचाऱ्यांना गोलाणी मार्केटला ठेवलेले आहे. आता सद्या कामांची गर्दी असल्यामुळे व उन्हाळा पाहाता लवकरच सुरू करण्यात येईल .

**श्री.नितीन बरडे :-** ठिक आहे , सर मी आपल्या निदर्शनास आणुन दिलं होत प्लास्टीक घोटाळा तो तुमच्या समोर आला पुढे त्याची काय कार्यवाही झाली .

**मा.उपायुक्त , सार्व. आरोग्य:-** प्लास्टीक जे काही कार्यवाही मध्ये जप्त केलेले होते त्या प्लास्टीकच्या विल्हेवाटीच्या संदर्भामध्ये ऑक्टोंबर मध्ये ती प्रक्रीया सुरू केलेली होती याच्यामध्ये आम्ही एमपीसीबीची गाईडलाईन पण घेतलेली होती . आणि लेखी पत्रपण घेतलेले होते की कोणत्या पध्दतीने विल्हेवाट लावली पाहीजे आणि कोणत्या एजन्सीकडे काम द्यावे . त्या अनुषंगाने आरोग्याधिकारी यांनी दोन सॅनिटरी ईन्सपेक्टरची नियुक्ती केलेली होती .परंतु त्यांच्या परस्पर सिएसआय बडगुजर यांनी त्याबाबतीमध्ये पुढाकार घेवुन विल्हेवाट लावायची कार्यवाही पुढे केलेली आहे. आता याच्यामध्ये आरोग्याधिकाऱ्यांनी माझ्याकडे जो अहवाल ठेवला त्याच्यामध्ये काही मुद्यांचा खुलासा मी त्यांच्याकडुन मागवलेला आहे. किती ठिकाणाहुन जप्त केले व त्याच स्टॉक रजिष्टर ठेवले होते काय . ज्या दिवशी ते जिकडे डिस्पोज केले त्या दिवशी तिथे उपलब्ध कोण होते त्याचा पंचनामा ठेवला होता का आणि व्हिडीओ शुटींग ठेवलेली आहे का तर हे त्यांच्याकडुन एक

दोन दिवसांत त्याच्याकडुन माझ्याकडे आल्यानंतर तो अहवाल व त्याची विल्हेवाट बरोबर लावली आहे किंवा नाही ते एमपीसीबी कडुन तपासुन घेवु तसं त्यांचही आम्हाला पत्र आलेले आहे. पेपरची ही एक बातमी होती त्या अनुषंगाने आणि ती केलेली प्रक्रीया जर योग्य असेल एमपीसीबीच्या रिपोर्ट नुसार तर त्याच्यामध्ये दुसरे काही नाहीये . पण बडगुजर यांनी स्वत: पुढाकार घेवुन कोणताही आदेश नसतांना ती प्रक्रीया केलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब त्याच्यामधील पिशव्या ज्या परत दिल्या गेल्या काही त्याच्यातील अर्ध्या विकुन पैसे जमा केले अर्धे राहु दिल्या आणि ही कार्यवाही बंद झाली . जळगांव शहरात होलसेलचे आठ दुकाने आहे , प्रत्येकी दुकान पाच हजार रूपये महिना हप्ता चालु होता , प्लास्टीकच्या बाबतीत आपण काय कार्यवाही करणार आहेत आता याच्यापुढे .

**मा.उपायुक्त , सार्व. आरोग्य:-** आम्ही आता प्रत्येक सॅनिटरी ईन्सपेक्टर जे आहेत त्यांना त्यांच्या वॉर्डात कार्यवाही करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

**मा.आयुक्त :-** त्या संदर्भात आपण आता वारंवार जो दंड होतोय आणि लोकांना आता दंड भरायची सुध्दा सवय लागलेली आहे तर आपण आता बायोनिंग पध्दतीने किंवा दुसरा पर्याय सुचवु .

**श्री.नितीन बरडे :-** याच्यानंतर गोलाणी मार्केट च काय झालं हात लावलेला नाही ५७ दुकाने निघालेले आहेत त्याच्यावर अजुन कार्यवाही झालेली नाही नोटीसही गेल्या आहेत त्यांना ५७ दुकांनानी तिथं बदल केलेला आहे , मग नंतर तुम्हाला काहीच करता येत नाही रात्रीमध्ये भिंती बांधलेल्या आहेत त्यांनी

**श्री.शेख , नगररचना सहाय्यक :-** आम्ही गेले होते त्यांची पाहणी करून त्यांचा रिपोर्ट वगैरे सर्व तयार आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तयार आहे त्याला तयार करायला किती दिवस झाले मागच्या काही नोटीसा दिल्या आहेत .त्या नोटीसी नंतर पुढची काही कार्यवाही केली का .

**श्री.शेख , नगररचना सहाय्यक :-** रिपोर्ट तयार आहे करारनाम्याची रद्दची कार्यवाही मार्केट वसुली विभागाकडुन करण्यात येईल .

**श्री.चेतन सनकत :-** जे दिडशे लोकांना नोटीसा दिल्या होत्या गोलाणी मधील म्हणतोय मी त्याचे काय झाले मागच्या ३ तारखेच्या मिटींगमध्ये ही चर्चा झाली होती भाऊ या कार्यवाही सोबत या सर्वांवर कार्यवाही करावी .

**श्री.नितीन बरडे :-** नोटीसा कधी पोहोचल्या आहेत नोटीसा दिल्यानंतर कार्यवाही काय केली.

**श्री.चेतन सनकत :-**आता जे आहेत ती पण आणि मागची जी आहेत त्या सर्वांवर सोबत कार्यवाही करा.

**श्री.शेख , नगररचना सहाय्यक :-** आमच्याकडुन रिपोर्ट पाठवलेला आहे तर पुढील कार्यवाही साठी पाठविलेला आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आता जे नविन झालेले आहेत त्यांच्या नोटीसा कधी पोहोचतील.

**श्री.शेख , नगररचना सहाय्यक :-** आज जातील .

**श्री.सुनिल खडके :-** नेरी नाका जवळील वैकुंठधाम स्मशानभुमि येथे केशव स्मृती प्रतिष्ठान ,जळगांव यांनी लोकसहभागातुन स्वखर्चाने शव दाहीनी लावणेबाबतचा जो प्रस्ताव आहे , तो शुचिता ताईंनी तात्काळ विषय आज सभागृहापुढे ठेवला त्याबद्दल मी ताईंचे आभार व्यक्त करतो , तसेच केशव स्मृती प्रतिष्ठान यांनी आपल्या जळगांव करांसाठी जी शव दाहीनी उपलब्ध करून दिली , जळगांव शहरात आजपावेतो असे कार्य कुणीच केलेले नाहीये , तसेच मोफत करून देतो किंवा घरून करून देतो जसे हे पहिल्यांदा आलेले आहेत त्याबद्दल मी त्यांचे व भरतदादा अमळकर यांचेही आभार व्यक्त करतो तसेच आज आपले आयुक्त साहेब यांची शेवटची मिटींग आहे .तर त्यांनाही मी अभिवादन करतो व तुम्हालाही मी सांगु ईच्छितो सर तर मी कर्मचाऱ्यांसाठी मी मागतो आहे माझ्यासाठी काही नाही तर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागु करावा .

**मा.आयुक्त :-** प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे.

**श्री.सुनिल खडके :-** तसेच काही जणांचे ईन्क्रीमेंट राहीलेले आहे ते सुध्दा लागु करण्यात यावे तसेच १५ कर्मचारी आहेत त्यांची पेंशन लागु झालेली नाहीये त्या संबंधी आपण लक्ष घालावे पवार साहेबांना तो विषय माहिती आहे . अजुन एक विषय असा आहे अनुकंपाचे ६५ ते ६६ लोकं आहेत जर तुमच्या अधिकारात कायद्यानुसार जर घेता आले तर .

**मा.आयुक्त :-** आता काही शिल्लक राहीलेले नाहीत .

**श्री.सुनिल खडके :-** राहीलेले आहेत साहेब एवढी मी विनंती करतो सभागृहाच्या वतीने .

**मा.**आयुक्त :- कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जे काही पेंशन न लागलेल्या जवळपास ५७ केसेस होत्या अश्या सगळयांचा रिव्हीव घेतलेला आहे आणि त्याच्यात काही डॉक्युमेंटस कमी होते ते एक पुर्ण करून घेतले जात आहेत. आणि त्याच्या नंतर आता या पुढच्या वर्षामध्ये २०२० मध्ये जे सेवानिवृत्त होणार आहेत त्यांची एक माहिती आपण गोळा करतोय आणि ती यादी पब्लीश करू दुसरा मुद्दा अनुकंपाच्या बाबतीत पहिल्यांदा आपल्याला आकृतीबंध मंजुर होणे गरजेचे आहे कारण कोणत्या पदाची किती संख्या आहे ते असल्या शिवाय आपल्याकडे पदं किती उपलब्ध आहेत ते सांगता येणार नाही आकृतीबंध सुध्दा मुठे साहेब आता परवाच गेले होते मंत्रालयामध्ये ते साधारणता महिना दोन महिन्यात पाठपुरावा केला तर तेही काम होवुन जाईल त्यानंतर अनुकंपाचा विषय होईल , अनुकंपाच्या जवळपास ६० ते ६५ केसेस आहेत त्यात साधारणता २० ते २२ केसेस आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर आपल्याला ती कार्यवाही करता येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , टिबीएस हॉस्पीटल येथे कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाबाबत बोलतोय आपण तेथे आरोग्याधिकाऱ्यासोबत व्हिजीट सुध्दा दिलेली आहे त्यावेळी दंडवते साहेबांसोबत मी सुध्दा जावुन आलो आपल्या जाण्याच्या आधी आम्ही तिथे जावुन पाहणी करून आलो आणि ज्या प्रकारे ती होते त्यात एक थोडी शंका आहे म्हणजे ते डॉक्टर असतील तसेच एक स्त्री रोग तज्ञ आहेत आणि डॉ. स्नेहल फेगडे यांना आपण घेवुन गेलात , परंतु ज्या प्रकारे ती झाली पाहीजे त्या प्रकारे ती होत नाही असा एक अभिप्राय त्यांचा सभागृहापुढे मांडतोय तर असे वाटतेय की ते पुर्णपणे सक्सेसफुली नाहीये तरी त्याची जागरूकता म्हणुन आपण आता जर लक्ष दिले तर त्याचा फायदा होईल . ते उचलतांना विविध भाग करत आहेत ते शहराच्या विविध भागातुन उचलुन त्यांचे निर्बीजीकरण करताहेत परंतु ते पुर्णपणे सक्सेस होत नाही. आणि ते जे दावा करताहेत की आम्ही हे अश्या प्रकारे करताहेत व त्याच्यानंतर मी चौकशी केली व माहिती घेतली दोन चार डॉक्टरांकडुन तर ते सक्सेसफुल पणे नाही तरी माझी एक विनंती आहे सभागृहाला की त्याच्यावर ते काम करताहेत परंतु ज्या प्रकारे ते झाले पाहीजे त्या प्रकारे ते होत नाहीये , म्हणुन सभागृहाला विनंती आहे की यामध्ये पुन्हा लक्ष घालावे जेणेकरून जळगांव शहरातील वाढणारी कुत्र्यांची संख्या याच्यावर बंधन येईल , त्यानंतर दुसरा एक विषय मागील काही मिटींग मध्ये आपण एलईडी च्या लाईटासंबंधी घेतला होता त्याची १९/०१ ही शेवटची तारीख आपल्याला दिली होती आणि त्यात आपल्याला सांगीतले होते की १९/०१ ला ते काम सुरू होवुन जाईल तर ते कुठपर्यंत आले आहे..

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** आपण केलेल्या ठरावानुसार त्यांना नोटीसा दिल्या होत्या व ७० वॅटचे जे फॉल्टी होते ते सेंट्रल लाईन होते त्यात प्राब्लेम आल्यामुळे ते बंदच होते आणि त्यांनी बसविलेल्या लाईटस पैकी त्यांनी काही चुकीच्या ठिकाणी बसविलेले आहेत तर त्याचे काम सुरू केलेले आहे तसेच परवा पासुन टॉवर पासुन ते छत्रपती शिवाजी पुतळया पावेतोचे काम पुर्ण झालेले आहे व आजही काम सुरू आहे .

**श्री.विष्णु भंगाळे :-** अजुन पुढच्या स्टॅंडींग पावेतो किती प्रगती होईल .

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** फॉल्टी जे होते ती त्यांची जबाबदारी होती व ती त्यांनी मान्य केलेली होती व ते काम त्यांनी सुरू केलेले आहे व तिथे मॉडीफीकेशनचे काम सुरू आहे .

**श्री.विष्णु भंगाळे :-** दाणा बाजारचे काम कधी होईल.

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** सगळयात आधी सेट्रल लाईनचे काम होईल व नंतर दुसरी कामे होतील .

**श्री.विष्णु भंगाळे :-** कसे आहे महिना दोन दोन महिने लाईट बंद असतात त्याला पर्याय काय आहे.

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** साहेब कसे आहे एलईडी आपल्याकडे नाहीयेत त्यांनी जे बसविलेले होते आणि सगळी कडे आपल्याकडुन बसविणे शक्य नव्हते व आपल्याला काही बंधने होते म्हणुन आपण ते काम त्याच्याकडुन करून घेतोय .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे शिफ्टींग ला वेळ लागु शकतो परंतु त्या भागात मोठया प्रमाणात वाहतुक आहे . आणि सातत्याने दिवसातुन तिथे दहा वेळा वाहतुक कोंडी होते , रात्रीच्या वेळेला अशी परिस्थिती असते कि संपुर्ण अंधार असतो कुठले वाहन कुठुन घुसतेय हे ही दिसत नाही आणि शिफ्टींग ला वेळ लागु शकतो तरी तिथे काही दिवे सुरू करावे.

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** काय झाले आहे भाऊ की फोर लाईनचे काम सुरू असल्यामुळे जी मेन लाईन होती ती काढुन टाकण्यात आलेली आहे व आम्ही संबंधित कंपनीशी संपर्क साधला व त्यांना कळविले की त्यांनी याबाबतचे नियोजन काय आहे हे आम्हाला कळवावे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता जी सिस्टीम लागेल शिफ्टींगला हायमास्ट पोलला .

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** त्याची निविदा प्रक्रीया करून आपण ते लवकरच करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो पावेतो दुसरे काही पर्याय असतील तर ते करावे.

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** होय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण महिना दोन महिन्यानंतर . . .

**श्री.सुशिल सांळुखे , विद्युत विभाग प्रमुख :-** निविदा प्रक्रीया राबवुन लवकरच करतो .

**श्री.विष्णु भंगाळे :-** रेल्वे गेटचे विषय बरेच गाजले आहेत आपले व रेल्वे काहीतरी पर्यायी व्यवस्था करेल परंतु तोपर्यंत आसोदा रेल्वे गेट ते ममुराबाद रोड जो रेल्वे लाईन जवळचा कच्चा जो रोड आहे त्याला जर व्यवस्थित थोडा फार करून दिला व पर्यायी व्यवस्था जी होईल त्या माध्यमातुन मोटार सायकलींचे प्रमाण कमी होईल तसेच बाकी या माध्यमातुन येता येईल . चांदेकर व भोळे साहेब तिथुन आले होते तर त्यांची एक डिमांड होती की आपण त्याप्रमाणे करावं तरी आपल्याला विनंती आहे की आपल्याला यावर काही करता येईल का .

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** परवाला मा.आयुक्त साहेब , महापौर ताई , व सभापती ताई यांनी त्या ठिकाणी व्हिजीट केलेली होती व आपण यापुर्वीच तो रस्ता क्लीयर केलेला होता आपण काही महिन्यापुर्वी तो रस्ता सूरू केलेला होता शिवाजी नगरच्या ब्रिजच्या वेळेस व आता त्या भागामध्ये आपल्याला काही जागा अधिग्रहीत करायची आहे त्या संदर्भात टाऊन प्लॅनिंग मधील लोकांनी मोजमाप घेतलेले आहे परंतु माझी अशी विनंती होती त्यावेळेस की तिथे चौथ्या

ट्रॅकचे काम करण्यात आलेले आहे ते फीडींग करून कॉम्पॅक्शन करण्यात आलेले आहे म्हणजे एक रस्ता तयार करण्यात आलेला आहे व आपण जर डिआरएम साहेबांना रिक्वेस्ट केली तर तसेच रेल्वेचे अधिकारी म्हणाले होते की आम्ही फक्त एक महिन्यासाठी बंद करणार आहे ओरली म्हणजे पेपरवर नाही , म्हणजे त्यांचा जो त्यांचा एक कॉलम आहे तो रोडवर येतोय त्याकरीता त्यांना ते गेट एक महिन्याकरीता बंद ठेवावे लागेल व नंतर ते गेट उघडु मग एक महिन्याकरीता तो जो त्यांनी ट्रॅक तयार केलेला आहे तो जर वापरण्यास त्यांनी मुभा दिली तर यासाठी आपल्याला काही अडचण येणार नाही .

**श्री.विष्णू भंगाळे :-** आयुक्त साहेबांची आजची एक शेवटची मिटींग म्हणावीच लागणार आहे साहेबांनी गेल्या वर्षभराचा जो कार्यकाळ आहे तो चांगल्याप्रकारे महापालिकेला दिला आणि त्यांनी प्रत्येक गोष्टींत लक्ष घालुन जे काही प्रश्न सोडविता येतील व त्या माध्यमातुन त्यांनी सोडविलेले आहेत आणि आमच्या शिवसेने तर्फे त्यांचे एक बुके देवुन स्वागत करू ईच्छितो .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझा एक विषय आहे माझ्या प्रभागाचा नसुन संपुर्ण जळगांव शहराचा आहे आपण पाचोरा रोडावर जातो गायत्री नगरजवळ एक मोरी आहे आणि तीथे सतत ती गटार ओव्हर फ्लो भरून वाहते व आपण ती गटार अर्धा भाग तोडुन टाकलेला आहे आणि त्याच पाणी आपण पास केले होते तो तसाच पडला आहे त्याला रिपेअर करण्याचे किंवा नविन बनविण्याचे काय प्रयोजन आहे असे आपण विचारल्या नंतर बी एन्ड सी चा रस्ता आहे असे म्हणतो बी एन्ड सी चा रस्ता आहे आपण त्या रस्त्यावर खड्डे बुजवु शकतो तो पुल अर्धा तोडुन पाणी पास करू शकतो पण नविन बनवु शकत नाही तर याच्यासाठी काय करावे लागेल तो बनवुन द्या माझ्या वॉर्डाचा आहे म्हणुन सांगत नाहीये मी तो स्टेट हायवे आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-**ढेकळे साहेब ही सुचना आपण यापुर्वीच मांडलेली होती , तिथ आंदोलन करा मी तुमच्या सोबत येतो तिथे कारण काय होईल दोन महिन्यापासुन तुमचा प्रयत्न आहे आणि जर न्याय मिळत नसेल तर मग काय पर्याय आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझ्या प्रभागाचा प्रश्न नाहीये संपुर्ण शहराचा प्रश्न आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण शहराची चिंता आहे परंतु तुमचीच चिंता गांर्भीयाने घेत नाहीये .

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** त्या रोडाचे काम बी एन्ड सी करत आहे ते काम आपले नाहीये मी स्वत: कार्यकारी अभियंता यांना जावुन भेटलो व ते मान्य करतात की ते आमच्या प्रीमायसिस मध्ये आहे आणि ते काम आम्ही करून देवु .

**मा.सभापती :-** कधीपर्यत करून देणार आहे.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** कधीपर्यंत करून देवु असे नाही सांगीतले त्यांनी ते साहेब म्हणाले की आम्ही करतो .

**मा.सभापती :-** त्याचा पाठपुरावा करा व ते सदस्यांच्या निदर्शनास आणुन द्या आणि लवकरात लवकर करून घ्या.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** अजुन एक विषय होता की भाऊंचा व आयुक्त साहेबांचा मागे एक विषय झाला होता की १५ तारखेला सी .एम साहेब जळगांवला येताहेत तर सी.एम साहेब त्याच रस्त्यावरून जाणार आहे त्याच्या येण्याअगोदर जर होत असेल तर मी तसे त्यांना भेटुन विचारून घेतो .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्यांच्या येण्याच्या आधी बनवायला लावा त्याला काही जास्त वेळ नाही लागत काहीतरी १० दिवसांत ती मोरी तयार होईल .

**श्री.राजेद्र पाटील :-** मागील सभेत महापालिकेने तरतूद करावी अश्याही सुचना केल्या होत्या.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** किती वेळा हा विषय झाला आहे हे बरोबर नाहीये .

**मा.आयुक्त :-** आता तरतूद करून काही होणार नाहीये .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मी कधीपासुन सांगतोय की काम करा लोक म्हणाले की आम्ही मत दिले आहे मागे वृत्तपत्रामध्ये छापुन आले की ढेकळेंना घरचा आहेर लवकर होणार नाही हा एक विषय आहे हे असे छापुन आले तर हे काम लवकर करा .

**श्री.विष्णू भंगाळे :-** सभापती महोदय , ढेकळे साहेबांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे .

**मा.सभापती :-** सगळया सदस्यांनी खाली बसुन घ्यावे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सर्व सदस्य सिनियर आहेत अश्या पध्दतीची सभा चालविणे हे उचित आहे का हे सांगा .

**मा.सभापती :-** विष्णू भाऊ आपण खाली बसा आपल्याला बोलण्याची पुर्ण संधी दिलेली आहे .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** विष्णू भाऊ मला बोलण्याची परवानगी दिलेली आहे म्हणुन सभापती महोदय आपल्याला बोलताहेत. तुम्हाला बोलण्याची संधी दिलेली होती व तुम्ही बोलले तसेच मी बोलत असतांना तुम्ही गदारोळाला सुरूवात केली मी प्रश्न मांडतोय आणि तुम्ही प्रश्नाला असे बोलु नका व आपण गैरसमज करून घेवु नका माझ वैयक्तीक काही नव्हत एक दुसरी विनंती आहे आयुक्त साहेब आज आपला शेवटचा दिवस आहे .आपण खुप चांगलं काम केले आहे .सभागृहाच्या वतीने मी आपले खुप खुप आभार मानतो , आपल्याला धन्यवाद देतो आणि येणारे आयुक्त म्हणजेच वर सत्ता आपलीच आहे आपल्या सारखे आयुक्त आणणार आहे असे ऐकले त्यांना शुभेच्छा देतो की साहेबांसारखेच आयुक्त मागवा अजुन ऐक छोटेसे काम आहे.सर्वांचे जे काही मागील मानधन आहे ते आज काढुन द्यावे अशी विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** जमा झाले नाही का .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** नाही अजुन दिले नाही , म्हणुन २००८ पासुन शिल्लक आहे यापुर्वी जे जुने नगरसेवक आहेत त्यांचे बाकी आहे मी विनंती करतो आणि जे राहीले आहेत त्यांना देवुन टाका , दुसरा विषय असा की तलावाचा एक विषय होता तलावाच कुठपर्यंत आले त्याचा लिलाव कित्येक वर्षापासुन त्याला स्टे आहे आपली मंडळी तसेच आपण सुध्दा त्या समितीवर आहात त्याचे प्रमुख आहात त्याचा पाठपुरावा करा महापालिकेला उत्पन्न होईल आणि दुसरे की त्या तलावामध्ये ज्या काही अश्या घटना होतात जीव देण्यासारख्या म्हणजे जो घेणार असेल त्याचे लक्ष राहील आणि अश्या घटना सुध्दा टळतील आणि महापालिकेला त्यातुन दोन पैसे मिळतील हा लिलाव केल्यानंतर आता काही लोक ओपन त्या ठिकाणी मासेमारी करताहेत आणि स्वत:ची मालकी दाखवत आहेत अश्या पध्दतीचं काम सुरू आहे त्याबाबत विचारा म्हणजे बरे होईल.

**मा.सभापती :-** विधी विभाग

**श्री.किरण भोळे, विधी शाखा प्रमुख :-** त्याला स्टे आहे तसेच ते जे वकील होते ते आता आपले वकील आहेत त्यामुळे अर्ज दिल्याशिवाय वकील लावता येणार नाही व ती केस कोर्टामध्ये पेंडींग आहे याच्यामध्ये जे समोरच्या पार्टीचे जे वकील होते ते आता आपल्या पॅनल वर आहेत .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता हे कामकाज जे आहे ते मला वाटत नाही की योग्य आहे या गोष्टी अश्या आहेत की वादग्रस्त होवु नये म्हणुन माझी एक विनंती आहे की लवकर करून घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ढेकळे साहेब तुमची विनंती आहे टेंडर द्यायचा .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझा विषय आहे डि मार्ट पासुन ईच्छादेवी चौकापर्यंत रोड डिव्हायडर टाकणे आणि पोल शिफ्टींग चे काम होते आजपर्यंत झाले नाही वर्क ऑर्डर देवुन बरेच दिवस झाले आहे ते कधी होईल .

**मा.आयुक्त :-** निधी आहे का .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** निधी आहे ना निधीचेच काम आहे . २५ कोटींतील निधीचे काम आहे ते . काय आहे की कोणत्या माणसाला धक्का लागेल असे अनेक प्रकार होतात .

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते काम सुरू करण्यापुर्वी त्या रस्त्याची रूंदी मोजुन घ्यावी . दुसरा विषय लाईटस चा ते सुध्दा प्राथमिकतेने लावण्यात यावे म्हणजे हे ईलेक्ट्रीक पोल शिफ्टींग करतांना दोन्ही बाजुने रस्ता आपल्याला वापर करता येईल . आता हा रस्ता १८ मीटर परंतु मुख्य रस्त्याची ती रुंदी आहे ती साधारण ७ ते ७.५ मीटर वापरा मध्ये येते आणि खुप हेवी आहे .

**नगरसचिव :-** जळगांव महापालिकेत श्री.पवार साहेब हे नगररचनाकार या पदावर रूजू झालेले आहेत मी त्यांना विनंती करतो की त्यांनी सभागृहाला आपला परिचय करून द्यावा.

**श्री.पवार , नगररचनाकार :-** मा.सभापती महोदय, मा.आयुक्त आणि सभागृहातील सन्मा.सदस्य मी माझी ओळख करून देतो माझे नांव सु.वा.पवार मी जालना येथे नगररचनाकार या पदावर आहे व मला येथे अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. आणि मागील डिसेंबर पासुन येथे कार्यरत आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** पवार साहेब परंतु नगररचनाची जबाबदारी खुप महत्वाची आहे आणि खुप बदनाम झालेला तो विभाग आहे तर आपणांस विनंती आहे की कमीत कमी की ज्या काही मागच्या चुका झाल्या असतील त्या चुकांवर किंवा त्या पावलांवर पाऊल न ठेवता त्या विभागाला योग्य दिशा देवुन सुधारण्याचं काम कराल मी एवढीच एक माफक अपेक्षा आपल्याकडे ठेवतो .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव सि.स.नं.१९६३/ब नेरीनाका जवळील वैकुंठधाम स्मशान भूमीत सदयस्थितीत १७ शवदहनाकरीता ओटे तयार करण्यात आलेले असुन लाकडे जाळून शव दहनाचे काम करण्यात येते.

केशवस्मृती प्रतिष्ठान जळगांव यांनी अर्ज क्रं.ksp/०१/२०२० दि.०१/०१/२०२० चे पत्रानुसार लोकसहभागातून व सामाजिक दायित्वातून स्वखर्चाने आधुनिक शवदाहीनी पुरविणे, बसविणे व देखभाल दुरुस्ती करणेची तयारी दर्शविली आहे. या संपुर्ण प्रकल्पासाठी येणारा खर्च सदर संस्था करणार आहे. यात आधुनिक शवदाहीनी (विदयुत/गॅस संचलित) महानगरपालिकेच्या सदयस्थितीतील स्मशानभूमीच्या जागेत बसविण्यात येणार असल्याची व अंत्यविधीसाठी शवदाहीनी वापरणेकरीता संस्थे मार्फत माफक शुल्क आकारण्यात येईल अशी माहीती कळविले आहे.

केशवस्मृती प्रतिष्ठान जळगांव यांचे पत्रानुसार पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे व लाकुड तोडीपासून वृक्ष संवर्धन होणे आजच्या काळाची नितांत गरज आहे. तसेच लोकसहभागातून नवीन नागरी सुविधा माफक दरात

निर्माण होणार असल्याने केशवस्मृती प्रतिष्ठान जळगांव यांचा प्रस्ताव स्विकृत करणेस व महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ नुसार सदर संस्थेशी कराराच्या मसुदयानुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १५ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :-** मा.आयुक्त महोदय हे आज दि.३१/०१/२०२० रोजी विहीत वयोमानानुसार प्रशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त होत आहेत त्यामुळे मा.सभापती महोदया यांचे निर्देशानुसार सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांना विनंती करतो की त्यांनी मा.आयुक्त महोदय यांना शुभेच्छा द्याव्यात.

मा.सभापती महोदया व सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांनी मा.आयुक्त साहेबांना फुलगुच्छ देवुन शुभेच्छा दिल्या.

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**